दैनिक
अचूक वेध, अचूक बातमी
# अक्षराज
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
वर्ष : ०४, अंक : २२८
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.in
Email : newsaksharaj2021@gmail.com
बुलडाणा, रविवार, दि.३० मार्च २०२५





गुढी पाडवा
आपणांस व आपल्या परिवारास
हिंदू नववर्ष व गुढीपाडव्याच्या
हार्दिक शुभेच्छा !



श्री बाल विकास केंद्र
डॉ. आकांक्षा श्रीधर मढवी
व्यावसायिक थेरपिस्ट
+91 87791 10823
परिस्थितीत विशेषज्ञता मिळवा
- ऑटिझम स्पेक्ट्रम डिसऑर्डर
- विकासात्मक विलंब
- डाउन्स सिंड्रोम
- शिकण्याची अक्षमता
- अति चंचलता अवस्था
- बोलण्यात विलंब
- तोंडी समस्या
- तोतरेपणा
- वर्तनातील अडचणी

आमच्या सेवा
- ऑक्युपेशनल थेरपी
- स्पीच थेरपी
- संवेदी एकीकरण थेरपी
- न्यूरोडेव्हलपमेंट मूल्यांकन
- विशेष शिक्षण (हळू शिकणाऱ्यांसाठी)

ओम साई सिद्धी, दुकान क्रमांक ०२, प्लॉट क्रमांक १३३-१३६, रेल्वे आरोग्य युनिटसमोर सेक्टर २३,जुईनगर, नवी मुंबई, ४००७०५.


## शेतकऱ्यांना ५० कोटी रुपयांचा निधी, १० हजार शेतकऱ्यांना लवकरच वितरण



**दि.२९, अहिल्यानगर :** ठिबक, तुषार सिंचन, शेततळे प्लास्टिक अस्तरीकरण, कांदाचाळ, ट्रॅक्टर व औजारे, शेडनेट, पॉलीहाऊस या बाबीं करीता शासनस्तरावर प्रलंबित असलेल्या प्रस्तावाचा निधीसाठी पाठपुरावा केल्यामुळे जिल्ह्यातील शेतकऱ्यांना ५० कोटी रुपयांचा निधी कृषि विभागास वितरीत केला असल्याची माहीती जलसंपदा तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांनी दिली.

जिल्ह्यातील जवळपास १० हजार शेतकऱ्यांना ५० कोटी रुपये निधीचे वितरण येत्या आठवड्यात होईल असे सांगून विखे म्हणाले की, जिल्ह्यातील विविध तालुकास्तरीय दौऱ्यावर असताना तसेच जनता दरबार दरम्यान विविध तालुक्यातील शेतकरी बांधवांनी कृषि विभागातील प्रलंबित अनुदानाची मागणी सातत्याने केली होती. जिल्ह्यातील बहुसंख्य शेतकऱ्यांनी शेडनेट, कांदाचाळ, ठिबक सिंचन यासाठी अनुदान मिळावे म्हणून प्रस्ताव सादर केले होते. मात्र शासनस्तरावर अनुदानाचा निधी जवळपास एक ते दिड वर्षापासून प्रलंबित होता.

विधिमंडळाच्या अधिवेशना दरम्यान प्रलंबित अनुदान जिल्ह्यातील शेतकऱ्यांना मिळावे म्हणून कृषी विभागाच्या अधिकाऱ्यां समवेत बैठक घेवून निधी तातडीने देण्याच्या सूचना दिल्या होत्या. त्यानूसार राष्ट्रीय कृषि विकास योजने अंतर्गत जिल्ह्याला ५० कोटी रुपये निधी प्राप्त करून घेण्यात यश आल्याचे विखे म्हणाले.

> वितरीत होणाऱ्या निधीमधून जिल्ह्यातील जवळपास १० हजार शेतकऱ्यांचा प्रश्न मार्गी लागणार आहे. कृषी विभागास वितरीत करण्यात आलेल्या निधीतील ९ हजार ११७ ठिबक व तुषार संच धारक शेतकऱ्यांना ३३ कोटी रुपये, शेततळे अस्तरीकरणातील ८४० शेतकऱ्यांना ५ कोटी ५० लाख रुपये, कांदाचाळ उभारणी करणाऱ्या ९६ शेतकऱ्यांना ९६ लाख रुपये, ट्रॅक्टर व औजारे अनुदानावर खरेदी करणाऱ्या २७१ शेतकऱ्यांना २ कोटी ९५ लाख रुपये, शेडनेट व पॉलीहाऊस उभारणी करणाऱ्या ४० शेतकऱ्यांना ४ कोटी ७८ लाख रुपये असा समावेश आहे.
>
> **– सुधाकर बोराळे, जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी**

**सहकार चळवळीसाठी त्रिभूवन सहकार विद्यापीठ मार्गदर्शक ठरेल– मंत्री विखे**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली केंद्रीय सहकार मंत्री अमित शाहा यांनी संसदेत त्रिभूवन सहकार विद्यापीठ स्थापन करण्याच्या घेतलेल्या निर्णयाचे आपण स्वागत करतो, या विद्यापीठामुळे सहकार क्षेत्र विस्तारण्यासाठी पाठबळ मिळेल. विद्यापीठाच्या स्थापनेमुळे सहकारी संस्थाचा विस्तार, संशोधन आणि सहकार प्रशिक्षणाच्या संधी निर्माण होवून या चळवळीला व्यापक स्वरुप मिळेल, त्रिभुवन सहकार विद्यापीठामुळे नव्या उद्यमशीलतेची सुरूवात व सहकारातून रोजगाराच्या संधी निर्माण होईल. आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष सुरु असतानाच त्रिभूवन सहकार विद्यापीठाची स्थापना होणे ही सहकार चळवळीच्या दृष्टीने नवी सुरुवात आहे. सहकार चळवळीसाठी हे विद्यापीठ एक मुख्य मार्गदर्शनाचे केंद्र ठरेल. या विद्यापीठाच्या माध्यमातून सहकार क्षेत्रातील शिक्षण विस्तार, प्रशिक्षण, संशोधनाची प्रक्रीया घडणार असल्याने गावातील सेवा सहकारी सोसायट्यांपासून ते सहकारी साखर कारखानदारी पर्यंत सर्वच संस्थांना या विद्यापीठातून आवश्यक असलेले मार्गदर्शन मिळेल, सहकार चळवळीला पुढे नेण्यासाठी सहकारी संस्थामधून सुरू असलेल्या उपक्रमांना या विद्यापीठामुळे अधिक गती मिळेल, संस्थामधील कार्यक्षमता, प्रशासकीय रचना सुधारण्याच्या संधीही या विद्यापीठामुळे निर्माण होणार आहे.

## थोडक्यात

### किरकोळ वादातून मामाकडून १५ वर्षीय भाच्याचा भोसकून खून

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२९, पुणे :** किरकोळ वादातून मामाने १५ वर्षीय भाच्याच्या छातीवर चाकूने वार करुन खून केल्याची घटना सिंहगड रस्त्यावरील नऱ्हे भागात शुक्रवारी रात्री घडली. पसार झालेल्या मामाला सिंहगड रस्ता पोलिसांनी अटक केली. गजानन गजकोश (वय १५, रा. धारावी, कोळीवाड्याजवळ, मुंबई) असे खून झालेल्याचे नाव आहे. याप्रकरणी मेधनाथ अशोक तपासे (वय ४१, रा. मानाजीनगर, नऱ्हे) याला अटक करण्यात आली. याबाबत आरोपी मेघनाथचा मेहुणा मंगेश दत्तात्रय ओव्हाळ (वय ३१, रा. कृष्णाईनगर, मानाजीनगर गणपती मंदिराजवळ, नऱ्हे) यांनी सिंहगड रस्ता पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. गजानन हा मामा मेघनाथ याच्याकडे राहण्यासाठी आला होता. शुक्रवारी रात्री त्याचा मामाच्या मुलाशी वाद झाला. वादातून मेघनाथने भाचा गजाननला पट्ट्याने बेदम मारहाण केली. त्यानंतर स्वयंपाकघरातील चाकूने त्याच्या छातीवर वार केला. चाकूने भोसकल्याने मोठ्या प्रमाणावर रक्तस्त्राव झाला. गंभीर जखमी अवस्थेतील गजाननला तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. उपचारांपूर्वीच त्याचा मृत्यू झाला होता. या घटनेची माहिती मिळताच परिमंडळ तीनचे पोलीस उपायुक्त संभाजी कदम यांनी घटनास्थळी भेट दिली. आरोपी मेघनाथला रात्री उशीरा अटक करण्यात आली. प्राथमिक चौकशीत किरकोळ वादातून आरोपीने मेघनाथने भाच्याचा भोसकून खून केल्याची माहिती मिळाली आहे. वरिष्ठ पोलीस निरीक्षक दिलीप दाईंगडे यांच्या मार्गदर्शनाखाली तपास करण्यात येत आहे.

### जुनी डोंबिवलीत गांजा तस्कर अटकेत

**दि.२९, डोंबिवली :** पोलीस उपायुक्तांचे अंमली पदार्थ विरोधी पथक आणि विष्णुनगर पोलिसांनी शुक्रवारी रात्री जुनी डोंबिवली शिवमंदिर परिसरात कारवाई करून एका गांजा तस्कराला अटक केली. हा तस्कर जुनी डोंबिवली भागातील रहिवासी असल्याचे पोलीस तपासात निष्पन्न झाले आहे. या तस्कराकडून २३ हजार रूपये किंमतीचा गांजा पोलीस पथकाने जप्त केला आहे. अमित पांडुरंग शिंदे (४२, रा. उमेश निवास चाळ, हनुमान मंदिराजवळ, जुनी डोंबिवली) असे पोलिसांनी ताब्यात घेतलेल्या तस्कराचे नाव आहे. अंमली पदार्थ विरोधी पथकाचे साहाय्यक पोलीस निरीक्षक सागर चव्हाण आणि पथकाला डोंबिवली पश्चिमेत संध्याकाळच्या वेळेत एक इसम गांजा विक्री करण्यासाठी येणार आहे, अशी गुप्त माहिती मिळाली होती. माहिती खात्रीलायक असल्याने वरिष्ठांच्या आदेशावरून विष्णुनगर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय पवार यांना ही माहिती देण्यात आली. पवार यांनी पोलीस निरीक्षक गहिनीनाथ गमे यांना अंमली पदार्थ विरोधी पथकाच्या साहाय्याने गांजा तस्कराला पकडण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करण्याच्या सूचना केल्या. एक गुप्त माहितगाराने पोलिसांना ही माहिती दिली होती.

## पुतण्याने केली काकाची हत्या, पोलीस ठाण्यात झाला हजर...

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२९, बुलडाणा :** क्षुल्लक कारणावरून पुतण्याने पित्यासमान काकाची हत्या केल्याची घटना नांदुरा तालुक्यातील सोनज इसबपूर येथे घडली. कुटुंबीयांसमोर काकांची हत्या करणारा निर्दयी पुतण्या नंतर पोलीस ठाण्यात हजर झाला. आज शनिवार, २९ मार्चला घडलेल्या या थरारक घटनाक्रमामुळे सोनज इसबपूर गावासह संपूर्ण नांदुरा तालूका हादरला आहे.

प्राप्त माहितीनुसार शुभम बोके (२१, रा. सोनज इसबपूर, ता. नांदुरा, जि. बुलढाणा) असे आरोपी पुतण्याचे नाव आहे. गोपाल मनोहर बोके (४५, रा. सोनज इसबपूर, ता. नांदुरा) असे मृताचे नाव आहे. आरोपी शुभम बोके याच्याकडे ट्रॅक्टर आहे. मात्र, शेतीमध्ये करावयाच्या कामांसाठी आणि खतांची वाहतूक करण्यासाठी काकाने आपला ट्रॅक्टर घेतला नाही, याचा शुभमला राग आला.

यामुळे त्याने काका गोपाल मनोहर बोके यांचे घर गाठले. तिथे जाऊन शुभम याने, 'शेतीच्या कामासाठी आणि खत वाहून नेण्यासाठी माझा ट्रॅक्टर का घेतला नाही?' असा सवाल करीत गोंधळ घातला. यावेळी गोपाल बोके यांचा मुलगा आणि पत्नी उपस्थित होते. त्यांच्यासमोरच घराच्या अंगणात काका-पुतण्यात कडाक्याचा वाद झाला. यामुळे शुभम बोके याने



रागाच्या भरात हातातील कुऱ्हाडीने काका मनोहर बोके यांच्यावर घातक हल्ला केला. कुऱ्हाडीचा वार मानेवर लागल्याने मनोहर बोके रक्ताच्या थारोळ्यात खाली कोसळले. त्यांना रुग्णालयात नेले असता उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला.

घटनेनंतर शुभम नांदुरा पोलीस ठाण्यात स्वत: हजर झाला. घटनेवेळी उपस्थित मृताचा मुलगा विश्वजीत बोके याने नांदुरा पोलीस ठाण्यात तक्रार दिली. यावरून पोलिसांनी भारतीय न्याय संहितेच्या कलम ३५२, १०३(१), ११५(२) नुसार गुन्हा दखल केला आहे. घटनेचा पुढील तपास नांदुरा ठाणेदार पोलीस निरीक्षक विलास पाटील करीत आहेत. दरम्यान, मलकापूर येथील उपविभागीय पोलीस अधिकारी सुधीर पाटील यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. तसेच तपासाच्या दृष्टीने सूचना दिल्या.

## नागपूर जिल्हा बँक कर्जबुडव्यांकडून सक्तीने वसुली करणार

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२९, नागपूर :** घोटाळा झाल्यानंतर बडघाईस आलेल्या नागपूर जिल्हा सहकारी बँकेला पुढील दोन वर्षांत नफ्यात आणण्याचे लक्ष्य असून कर्जबुडव्यांकडून सक्तीने वसुली करण्यात येणार आहे. नागपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत २००२ मध्ये १५० कोटींहून अधिक रुपयांचा घोटाळा उघडकीस आला होता. त्यावेळी काँग्रेस नेते आणि माजी मंत्री सुनील केदार या बँकेचे अध्यक्ष होते. त्यांना याप्रकरणी शिक्षा देखील झाली आहे.

आता ही बँक पूर्वपदावर यावी म्हणून प्रयत्न सुरू आहेत. या बँकेवर महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेला प्रशासक म्हणून नेमण्यात येत आहे. अशाप्रकारे महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेची 'संस्थात्मक प्रशासक' म्हणून नेमणूक होत आहे. सहकारातील हा अभिनव प्रयोग आहे. नागपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक गेल्या १३ वर्षांपासून तोट्यात आहे. या बँकेचा तोटा २९८ कोटींवर गेला आहे. ही बँक पुढील दीड ते दोन वर्षांत नफ्यात आणण्याचे उद्दिष्ट आहे. त्यासाठी काही उपाययोजना करण्यात येणार आहेत. राज्य सरहकारी बँक ५ लाख रुपयांपर्यंत मुतदठेवींची हमी बँक घेणार आहे. प्रशासक गुढीपाडव्यापासून सूत्रे स्वीकारणार आहेत. त्यानंतर जे कोणी या बँकेत मुदतठेव करतील त्यांची १०० टक्के हमी महाराष्ट्र राज्य सहकारी बँक घेणार आहे. तसेच राज्य सरकारने पूर्वीप्रमाणे शासकीय व्यवहार नागपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेमार्फत सुरू करावे, यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहिले आहे. बँकेचे १२४ न्यायालयीन प्रकरणे आहेत. त्यापैकी ६६ टक्के प्रकरणे बँकेने दाखल केले आहेत. ते न्यायालयाबाहेर तडजोडीने सोडवण्याचा प्रयत्न राहणार आहेत. या संपूर्ण प्रकरणे सुमारे २०० कोटी रुपयांचे आहेत. पहिल्या दहा कर्ज बुडव्यांकडे १४९ कोटी रुपये आहेत. त्यांनी प्रारंभी सवलतीची योजना देण्यात येईल. परंतु शेवटचा पर्याय म्हणून त्यांच्याकडून सक्तीची वसुली केली जाईल, असे प्रशासकाने सांगितले. राज्य सरकारने व्यक्तिगत प्रशासकांच्या मर्यादा व आजवरचा अनुभव पाहता, राज्य सहकारी बँकेने सुचवलेला 'संस्थात्मक प्रशासक' या पर्यायाचा विचार केला.

राज्य सहकारी बँकेस संस्थात्मक प्रशासक म्हणून नेमल्याने नागपूर जिल्हा बँकेच्या सक्षमीकरणासाठी राज्य सहकारी बँकेची सर्व साधने, संसाधने, तज्ज्ञ कर्मचारी, निधी व मालमत्ता यांचा वापर करणे शक्य होणार आहे. तसेच नागपूर जिल्हा बँकेबरोबर सहभागात, सहयोगात एकत्रितपणे कर्जवितरणाबरोबरच इतर अनेक उपक्रम राबवणे राज्य बँकेस शक्य होणार आहे. याबाबतची माहिती देण्यासाठी आयोजित पत्रकार परिषदेला दिलीप दिघे, अशोक माने, डॉ. अनंत भुईभार, बबिता तायडे, सुशील कुदमुलवार, सुरेंद्र लाखे उपस्थित होते.

## पत्रकार संरक्षण कायद्यानुसार हल्लेखोरांना शिक्षा द्या...

### वास्कर यांच्या समर्थनार्थ पत्रकारांची शिळ डायघर पो.ठाण्यावर धडक

**अक्षराज : विश्वनाथ शेनोय**

**दि.२९, कल्याण (ठाणे) :** अक्षराज मीडियाचे कल्याण ग्रामीण विधानसभा प्रतिनिधी विनोद वास्कर यांना दि.२८ मार्च २०२५ रोजी दुपारच्या सुमारास शिळ चौकात राहुल काटे आणि जितू आलिमकर या गावगुंडाकडून मारहाण करण्यात आली होती. सध्या विनोद वास्कर यांच्यावर घणसोली येथील रुग्णालयात उपचार सुरु आहेत.

तरी याप्रकरणी पत्रकार संरक्षण कायद्यानुसार पत्रकार विनोद वास्कर यांना न्याय मिळावा, यासाठी दिवा, शिळ, डोंबिवली व ठाणे या भागातील पत्रकार व पत्रकार संघटनेचे सभासद यांनी शनिवार, दिनांक २९ मार्च २०२५ रोजी शिळ डायघर पोलीस ठाण्यावर धडक दिली. पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदिपान शिंदे यांच्याशी चर्चा केली असता सदर प्रकरणातील आरोपींवर कलम ३२४ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे असे सांगण्यात आले. परंतु झालेल्या मारहाण प्रकरणात सदर आरोपींवर पत्रकार संरक्षण



कायद्यानुसार कारवाई करण्यात यावी व त्यांना कारावासाची शिक्षा व त्यांच्याकडून दंड वसूल करण्यात यावा. या मागणीसाठी अक्षराज मीडियाचे संपादक व पत्रकार तसेच पत्रकार संघटनेचे सभासद यांनी मागणी लावून धरली आहे. हे प्रकरण अक्षराज मीडियाचे संपादक विनोद गोरे यांनी ठाणे पोलीस आयुक्त आशुतोष डुंबरे यांच्यापर्यंत पोहोचवले असून या प्रकरणात पत्रकार विनोद वास्कर यांना न्याय देण्यात येईल असे पोलीस आयुक्त आशुतोष डुंबरे यांच्याकडून सांगण्यात आले आहे.

परंतु स्थानिक शिळ डायघर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदिपान शिंदे यांनी आरोपी यांना पत्रकार संरक्षण कायद्यानुसार शिक्षा देता येत नाही असे उपस्थित पत्रकारांना यावेळी सांगितले. असे असले तरी पत्रकार विनोद वास्कर यांच्या हल्लेखोरांवर पत्रकार संरक्षण कायद्यानुसार कलम लावून शिक्षा देण्यात यावी अशी अक्षराज मीडिया, दिवा, ठाणे, डोंबिवली, कल्याण व महाराष्ट्र भरातील सर्व पत्रकार बांधव यांच्याकडून एकच मागणी करण्यात येत आहे. जर वेळेत आमची मागणी पूर्ण झाली नाही तर सर्व पत्रकार संघटना व अक्षराज मीडिया पत्रकारांच्या वतीने शिळ डायघर या ठिकाणी पोलीस ठाण्याच्या समोर ठिय्या आंदोलन करण्यात येईल असा इशारा अक्षराज मीडियाचे संपादक विनोद गोरे यांनी दिला आहे.

## संपादकीय



### शितावरून भाताची परीक्षा

न्यू इंडिया को ऑप. बँकेवर गेल्या महिन्यात (फेब्रुवारी २०२५) रिझर्व्ह बँकेने कलम ३५ ए अंतर्गत निर्बंध लादले. त्यामुळे माध्यमांतील काहींनी, संपूर्ण सहकारी बँकिंग क्षेत्राच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह निर्माण करण्याचा प्रयत्न केला. सारासार विचार न करता, सहकारी बँकांवर टीका करणे सोपे आहे कारण त्या सॉफ्ट टार्गेट आहेत, त्यांना कोणी वाली नाही, त्यांचा कोणताही दबाव गट नाही. घोटाळा करणाऱ्या कोणत्याही बँकेचं, कर्मचाऱ्यांचं समर्थन कोणीही करू शकत नाही. तसा या लेखाचा उद्देशही नाही. मात्र राष्ट्रीयीकृत बँकांमध्ये हजारो कोटींचे घोटाळे होऊनही त्या बँकांवर बँकिंग नियमन कायदा ३५ ए ची कारवाई करण्यात आलेली ऐकिवात नाही. फार तर त्या बँकांवर पी.सी.ए.) अंतर्गत देखरेख ठेवण्यात आली. पण त्याबाबत जनतेत घबराट पसरवणाऱ्या बातम्या माध्यमातून देण्यात आल्या नाहीत, कारण एकच, या बँकांना सरकारचं संरक्षण आहे. कल्पना करा, या बँकांना सरकारचं संरक्षण नसतं तर? या पार्श्वभूमीवर रिझर्व्ह बँकेच्या वार्षिक ट्रेंड ॲण्ड प्रोग्रेस रिपोर्टमधील सहकारी बँकांची माहिती उद्धृत करण्याचा हा प्रयत्न. रिझर्व्ह बँकेने भारतातील सर्व बँकांबाबत तसेच नॉन बँकिंग कंपन्यांविषयी सविस्तर माहिती देणारा अहवाल अलीकडेच प्रसिद्ध केला आहे. त्यात खासगी, व्यापारी, सहकारी बँकांची तसेच नॉन बँकिंग फायनान्स कंपन्यांची ३१ मार्च २०२४ अखेरची व ग्रामीण सहकारी संस्थांची तुलनात्मक आर्थिक स्थिती प्रसिद्ध केली आहे. त्यातील नागरी सहकारी बँकांविषयीची माहिती सर्व संबंधितांना व्हावी यासाठी हा लेखन प्रपंच.

व्यवसाय मिश्रण

रिझर्व्ह बँकेच्या या अहवालानुसार देशभरात १४७२ नागरी सहकारी बँका कार्यरत आहेत. या बँकांमध्ये एकूण ५,५५, ४६९/- कोटी रुपयांच्या ठेवी असून ३,४६,९०३/- कोटी रुपयांची कर्जे त्यांनी वितरित केली आहेत. या बँकांकडे एकूण ७,०७,६६९ कोटी रुपयांची मालमत्ता शिल्लक आहे. आर्थिक वर्ष २०२२-२३ च्या तुलनेत ३१ मार्च २०२४ अखेरच्या ताळेबंदात ४ ची वाढ दिसत आहे. या सहकारी बँकांच्या ठेवींमध्ये मार्च, २०२४ अखेर ४ वाढ झाली असून, सप्टेंबर २०२४ अखेर ४.४ ची वाढ झाल्यामुळे, ठेव वाढीचे सातत्य दिसत आहे. सहकारी बँकांनी त्यांच्या ग्राहकांना दिलेल्या कर्जांमध्ये मार्च, २०२४ अखेर ५ ची वाढ झाली असून, सप्टेंबर २०२४ अखेर हाच वाढीचा वेग ६.२ नोंदवला आहे. व्यापारी बँकांच्या ठेवींमध्ये मार्च, २०२४ अखेर १३.४ ची वाढ झाली असून कर्जांमध्ये १६ वाढ झाली आहे. व्यापारी बँकांच्या देशभर असलेल्या शाखांची संख्या १,६०,००० हून अधिक असून, त्या तुलनेत सहकारी बँकांच्या शाखांची संख्या फक्त २३,१०० आहे. देशभर शाखांचे जाळे, तसेच व्यवसाय प्रतिनिधींचा सक्रिय सहभाग व आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर हे बँकांच्या प्रगतीचे वैशिष्ट्य आहे.

सहकारी बँकांच्या ठेवी व कर्जांचे गुणोत्तर ६२.५० तर व्यापारी बँकांच्या बाबतीत हेच गुणोत्तर ७६.८० आहे. सहकारी बँकांनी घेतलेल्या कर्जाचे प्रमाण फक्त ०.८ असून व्यापारी बँकांच्या बाबत हेच प्रमाण ९ आहे. सहकारी बँकांच्या गुंतवणुकीतील वाढ सातत्यपूर्ण आहे. सहकारी बँकांची एकूण गुंतवणूक १,९३,८१४/- कोटी रुपये आहे. ९० सहकारी बँकांची गुंतवणूक, वैधानिक तरलता प्रमाणपत्रांमध्ये आहे, तर व्यापारी बँकांचे हेच प्रमाण ८३ आहे. अनुत्पादित कर्जांचे प्रमाण

ढोबळ अनुत्पादित कर्जांच्या प्रमाणावर बँकांच्या कर्जाची गुणवत्ता ओळखता येते. सहकारी बँकांमध्ये गेली तीन वर्षे सातत्याने ढोबळ अनुत्पादित कर्जाच्या गुणोत्तरात सुधारणा दिसून येत आहे. गतवर्षी (मार्च २०२३) ८.८ असलेले ढोबळ अनुत्पादित कर्जाचे गुणोत्तर मार्च २०२४ अखेर ७.३ झाले आहे. तर नक्त अनुत्पादित कर्जांचे गुणोत्तर २.२ वरून १.२ झाले आहे. त्यामुळे तरतुदींचे गुणोत्तर ७७.१ वरून ८४.६ वर पोहोचले आहे.

## छत्रपती संभाजी महाराजांच्या हत्येचा गुढीपाडव्याशी संबंध आहे का ?



हिंदवी स्वराज्याचे धाकले धनी छत्रपती संभाजी महाराज यांची हत्या क्रूरकर्मा औरंगजेबाने अत्यंत हाल हाल करून फाल्गुन अमावास्येच्या रात्री केली याविषयीचे सविस्तर दाखले इतिहासकारांनी त्यावेळीच मांडले आहेत. मागील महिन्यात प्रदर्शित झालेल्या छावा चित्रपटाने हा सत्य इतिहास जगासमोर मांडला. असे असताना काही जात्यंध शक्ती समाजात दुही माजवण्याच्या उद्देशाने गुढीपाडवा जवळ आला की संभाजी महाराजांची हत्या ब्राह्मणांनी मनुस्मृतीनुसार केल्याचा विखारी प्रचार करताना आढळतात. सामाजिक माध्यमांतून तशा पोस्ट पसरवल्या जातात. ब्राह्मणद्वेषाची कावीळ झालेले हे महाभाग वर्षभर संभाजी महाराजांचे नावही घेत नाहीत; मात्र गुढीपाडवा जवळ आला की हा सण संभाजी महाराजांच्या हत्येप्रीत्यर्थ ब्राह्मणांनी साजरा करण्यास सुरुवात केल्याचे ढोल बडवून सांगू लागतात. रावणाचा वध करून प्रभू श्रीराम वनवासातून परतल्याच्या आनंद महाराष्ट्र प्रदेशात गुढ्या उभारून साजरा केल्याचा इतिहास आहे. आनंद साजरा करण्यासाठी महाराष्ट्रात पूर्वीपासून गुढ्या उभारत असल्याचा उल्लेख शिवकालीन इतिहासातच नव्हे, तर छत्रपती शिवाजी महाराजांच्या पूर्वकाळातील उपलब्ध पत्रव्यवहारांतूनही, संतांच्या अभंगांतून, इतिहासकालीन दाखल्यातून आढळतो. इतिहासाचार्य वि.के.राजवाडे यांनी 'मराठ्यांच्या इतिहासाची साधने', या नावाने इतिहासाचे अनेक खंड प्रसिद्ध केले आहेत ज्यामध्ये इतिहासकालीन विविध पत्र आणि दस्तावेज संग्रहित आहेत. त्यातील एका पत्रात 'गुढी पाडवा' या सणाचा उल्लेख केलेला आपल्याला आढळतो. या पात्रात असा उल्लेख आहे कि 'गुढीपाडवा या सणानिमित्त निराजी पंडित आपल्या घरी आले होते.' हे पत्र नारायण शेणवी या मुंबईच्या वकिलाने मुंबईच्या गव्हर्नरला लिहिले आहे. हे निराजी पंडित म्हणजे शिवरायांच्या अष्टप्रधान मंडळातील एक सदस्य होते आणि ते आपल्या घरी गुढीपाडव्यानिमित्त आल्याचा उल्लेख सापडतो. यावरून हे स्पष्ट होते कि शिवरायांच्या काळातही गुढीपाडवा सण साजरा केला जात असे.

आपल्या संतांनी देखील गुढीपाडव्याचा उल्लेख अनेक ओव्या आणि अभंग यांतून केला आहे. संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माउली ज्ञानेश्वरीतील अध्याय क्रमांक ४ ओवी क्रमांक ५२ मध्ये लिहितात 'अधर्माची अवधी तोडी। दोषांची लिहिली फाडी।सज्जनांकरवी गुढी। सुखाची उभवी।।' ज्ञानेश्वरीतील अध्याय क्रमांक ६ ओवी क्रमांक ५२ मध्ये पुढील ओळी आढळतात 'ऐके संन्यासी तोची योगी। ऐसी एकवाक्यतेची जगी। गुढी उभविली अनेगी। शास्त्रांतरी।।' तर अध्याय क्रमांक १४ ओवी क्रमांक ४१० मध्ये माऊली म्हणतात 'माझी अवसरी ते फेडी। विजयाची सांगे गुढी। येरू जीवी म्हणे सांडी। गोवी यिया।।' संत एकनाथ महाराज भागवतात श्रीराम चरित्र वर्णन करताना म्हणतात 'फेडावया देवाची साकडी। स्वधर्म वाढवावया वाढी। नामे मोक्षाची उभवावया गुढी। सूर्यवंशा गाढी दशा आली।।' पुढे श्रीकृष्ण चरित्रात ते म्हणतात, 'गुढीयेसी सांगू आले। कंस चाणुर मर्दिले।। हर्षे नाचताती भोजे। जिंकियेले यादवराजे।। गुढी आली वृंदावना। मथुरा दिली उग्रसेना।।झाला त्रिभुवनी उल्हास। लळीत गाये भानुदास।।' शिवकालीन खंडात होऊन केलेले जगद्गुरू संत तुकाराम महाराज गुढीचे वर्णन करताना म्हणतात 'ब्रह्मानंदे लोक सकळ नाचती।गुढीया उभविती घरोघरी।। ' एके ठिकाणी महाराज लिहितात, 'गोकुळीच्या सुखा अंतपार नाही लेखा। बाळकृष्ण नंदाघरी आनंदल्या नरनारी। गुढिया तोरणे करिती कथा गाती गाणे। तुका म्हणे छंदे येणे वेधिली गोविंदे।।' संत चोखामेळा यांचा पुढील अभंग तर सर्वश्रुत आहे, 'टाळी वाजवावी गुढी उभारावी। वाट ही चालावी पंढरीची ।।' यासंदर्भात संशोधनच करायचे म्हटले तर शेकडो पुरावे सापडतील, त्यामुळे छत्रपती संभाजी संभाजी महाराजांच्या हत्येचा संबंध गुढीपाडवा या प्राचीन सणाशी जोडण्याचा जात्यंध शक्तींचा अपप्रचार केवळ सामाजिक तेढ निर्माण करण्यासाठीच असल्याचे स्पष्ट होते. क्रूरकर्मा औरंगजेब हा अत्यंत निष्ठुर आणि धर्मांध होता. छत्रपती संभाजी महाराजांना पकडून एक महिना त्याने महाराजांवर अनन्वित अत्याचार केले. धर्मांतरण करण्यास दबाव आणला. छत्रपती शिवाजी महाराजांच्या आणि आई जिजाऊंच्या संस्कारांतून मोठे झालेल्या शंभू राजांनी प्राण त्यागने पसंत केले मात्र हिंदू धर्म त्यागला नाही. शंभूराजांची धर्मनिष्ठा औरंग्याच्या जिव्हारी खुपली. चैत्र शुद्ध प्रतिपदा हा हिंदूंचा सर्वात मोठा सण. हिंदूचा नववर्षारंभ. हा सण हिंदूंनी साजरा करू नये म्हणूनच फाल्गुन अमावास्येला त्याने छत्रपती संभाजी महाराजांची हत्या केली. त्याने ज्या उद्देशाने हा डाव साधला तोच डाव यशस्वी करण्याचा दुर्दैवी प्रयत्न आजची काही धर्मद्वेषी मंडळी करत आहेत. हल्ली गुढ्यांऐवजी घरांवर भगवे ध्वज उभारण्याचे आवाहन करणारे संदेशही सामाजिक माध्यमांतून पसरवले जाऊ लागले आहेत. भगवे ध्वज ही स्वराज्याची पताका तसेच हिंदू धर्माचे प्रतीक असल्याने घरावर अवश्य लावावेत; मात्र केवळ एक दिवसासाठी नव्हे, तर ते कायमस्वरूमी घरावर लावावेत. गुढीपाडव्याला मात्र हिंदू नववर्षाचे स्वागत शास्त्रोक्तरीत्या दारासमोर गुढी उभारूनच करावे.

**सौं. मोक्षदा घाणेकर, काळाचौकी, मुंबई**

## गुढीपाडवा : मराठी नव्हे, हिंदू नववर्षारंभदिन !

हिंदू वर्षातील पहिला दिवस आणि पहिला सण म्हणजे गुढीपाडवा ! वर्षातील साडेतीन मुहूर्तांपैकी पहिला मुहूर्त म्हणजे गुढीपाडवा ! या दिवशी कोणतेही शुभकार्य बिनदिक्कतपणे करावे, त्यासाठी म्हुर्त पाहण्याची आवश्यकता नाही. गुढीपाडवा हाच वसंत ऋतूच्या आगमनाचा दिवस. झाडांना नवीन पालवी फुटू लागते, निसर्ग बहरू लागतो.

सर्व ऋतूंत 'कुसुमाकरी वसंत ऋतू ही माझी विभूती आहे', असे भगवंतांनी श्रीमद्भगवद्गीतेत (१०:३५) म्हटले आहे. 'द्वादशमासैः संवत्सरः ।' असे वेदात म्हटले आहे. वेदांनी सांगितले म्हणून ते जगाने मान्य केले. त्यामुळे गुढीपाडवा हाच खरा नववर्षारंभ. श्रीरामांनी वालीचा वध केला तो दिवस गुढीपाडव्याचा होता.

शकांनी हुणांचा पराभव केला तो दिवस गुढीपाडव्याचा होता त्यामुळे याच दिवसापासून शालिवाहन शके कालगणना सुरु झाली. हा सण महाराष्ट्रात उत्साहाने साजरा होत असल्याने तो केवळ मराठी वर्षारंभ असल्याचा गैरसमज रूढ झाला आहे. रावणवधानंतर श्रीराम अयोध्येत परतले तो दिवस पाडव्याचा होता. या दिवशी सर्वांनी गुढ्या उभारून प्रभू श्रीरामांचे स्वागत केले. ब्रह्मदेवाने सृष्टीची निर्मिती केली आणि सत्ययुगाला सुरुवात झाली तोही दिवस पाडव्याचाच होता. त्यामुळे या दिवसाला सृष्टीचा आरंभ दिवस असेही म्हटले जाते.

याचे संदर्भ आपल्याला वेद-पुराणात आढळतात. गुढीपाडवा हाच नववर्षारंभ असण्यामागे नैसर्गिक, ऐतिहासिक आणि आध्यात्मिक कारणे आहेत. हल्ली गुढीपाडव्यानिमित्त रस्त्यावर ठिकठिकाणी शुभेच्छा देणारे बॅनर्स आणि होर्डिंग्स पाहायला मिळतात. सध्याचे युग हे सामाजिक माध्यमांचे युग असल्याने पाडव्यानिमित्त शुभेच्छा देणारे विविध संदेश या दिवसांत सामाजिक माध्यमांतून फिरताना पाहायला मिळतात. या सर्वांतून अनेकदा गुढीपाडव्याला मराठी वर्षारंभदिन असे संबोधले जाते. गुढीपाडव्याचे महत्व आणि या दिवसाची व्यापकता पाहता या सणाला केवळ मराठीचे लेबल लावणे म्हणजे त्या सणाला संकुचित करण्यासारखे आहे. त्यामुळे गुढीपाडव्याचे वैश्विक महत्व लक्षात घेऊन त्याचा हिंदू नववर्षारंभदिन असा उल्लेख सर्वत्र करणे इष्ट ठरेल.

**- जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**

## साखरगाठी..

नेसवता साडी चोळी
ती साधी सरळकाठी
उभी केली मस्त गुढी
गळा साखरेची गाठी

कडूनिंबाची पाने कडू
रे सुदृढ आरोग्यांसाठी
पाडव्याचा सण मोठा
जेंव्हाशेजारीसुखदाटी

पक्वान्नेप्रसाद वाटूया
दे गरीबा श्रीखंडवाटी
निमित्ताने जेवणावळ
सुग्रास भुकेल्या पोटी

सर्वांसांगे साखरगाठी
कटू शब्द नको ओठी
जे जे भले सारे घ्यावे
संस्कृती आपले पाठी

नवा अध्याय कोरावा
रे स्वच्छ मनाची पाटी
पिवळी पाने ढाळता
होई हिरवत्वाची दाटी

जाणा सण सार्थ अर्थ
जागृत सदैव अंतर्दृष्टि
ही ईश्वरोपाधि समष्टि
कळे जीवोपाधि व्यष्टि

**- हेमंत मुसरीफ पुणे**
**९७३०३०६९९६**


अक्षराज
अचूक ... अचूक बातमी


## सण साजरा करताना इतरांचा विचार करुया !

आज गुढीपाडवा, तर उद्या रमजान ईदचा सण आहे. अशा सणांच्या काळात सगळीकडे रेलचेल दिसते. बाजारपेठा फुलल्या दिसतात . दुचाकी व चारचाकी वाहनांची खरेदी हजारोच्या सख्येने होते. सोन्याचांदीची देखील विक्री मोठ्याा प्रमाणामध्ये नोंदवली जाईल. साखरेचे हार, फुले, पूजेचे सामान, नारळ इत्यादी घेण्यासाठी लोकांची झुंबड उडालेली दिसेल. फुटपाथवर काही लोक गुडी सोबत बांधायच्या कडूलिंबाच्या फांद्या आणि आंब्याची पाने विकत असताना हमखास दिसतील . हेच लोक घटस्थापने दिवशी माती ,स्वातंत्र्य दिन व प्रजासत्ताक दिनी झेंडे विकत असल्याचे पाहायला मिळते . सण उत्सवात रमणारे मध्यम, उच्च मध्यम, श्रीमंत आणि अति श्रीमंत लोक या लोकांचा विचार करतात का? एका मागून एका वस्तूची खरेदी करून 'स्वान्तसुखाय ' होणारे लोक आपल्या परिघा बाहेरील लोकांचा विचार करत असतील का?



आज पाडव्याच्या मुहूर्तावर मोठ्या प्रमाणात नवनवीन वस्तूंची खरेदी केली जाईल.दुचाकी आणि चार चाकी गाड्या, नवीन घरे, प्लॉट आणि इतर ग्रहपयोगी वस्तू यांच्या खरेदी विक्रीतून लाखो करोडोंची उलाढाल होईल. एक घर असतानाही दुसरे, तिसरे, चौथे घर... आजच्या मुहूर्तावर कोणीतरी घेईल. घरासमोर असणाऱ्या गाड्यांच्या लाईनीमध्ये अजून एका गाडीची कोणीतरी भर घालेल. घरातील भौतिक वस्तूंचा उपभोग घेण्यास वेळ नसतानाही नवीन काहीतरी घेतलंच पाहिजे हा अट्टाहास बाळगत काहीजण फुकट पैशाची उधळपट्टी करतील. एकूणच माणसाची संचयवृत्ती वाढत असल्याचे दसरा, पाडवा आणि अक्षय तृतीया या मुहूर्त असणाऱ्या सणाच्या दिवशी बाजारपेठांमधील दृश्य पाहून आपल्या लक्षात येते. आज श्रीमंत, श्रीमंत होत आहेत ;तर गरीब अधिकच गरीबच बनत चालले आहेत. अशा सणासुदीच्या काळात सामाजिक विषमता आपले भयानक रूप आपल्याला दाखवताना दिसते. आर्थिक समता प्रस्थापित होण्यासाठी मोठ्या प्रमाणात विविध प्रकारची कर आकारणी केली जात असतानाही अशी विषमता का वाढत आहे? याची कारणे शोधणे गरजेचे आहे. आज सर्वात श्रीमंत १ टक्के लोकांकडे राष्ट्रीय उत्पन्नातील तब्बल २१ टक्के वाटा आहे, तर सर्वात खालच्या स्तरातील ५० टक्के लोकांकडे या उत्पन्नाचा अवघा १३ टक्के वाटा असल्याचे जागतिक आर्थिक विषमता (इनइक्वॅलिटी) च्या अहवालात नमूद केले आहे.ही प्रवृत्ती सातत्याने वाढत आहे, म्हणजेच श्रीमंत लोक गरिबांपेक्षा खूप वेगाने श्रीमंत होत आहेत, ज्यामुळे उत्पन्नातील तफावत वाढत आहे.

गुढीपाडव्याच्या सुरुवातीलाच सोन्याचा एक तोळ्याचा भाव ९० हजाराच्या पार गेला आहे. तरी देखील आजच्या दिवशी सोने खरेदीची झुंबड उडल्याची पाहायला मिळेल. लोकांनी मोठ्या प्रमाणात खरेदी केली, तरच अर्थ चक्र वेगाने फिरते, नवीन रोजगार निर्माण होतात ; आणि आर्थिक विषमता कमी होते, हा अर्थशास्त्राचा सर्वसाधारण नियम आहे. एकीकडे खरेदी मोठ्या प्रमाणात होत असल्याचे दिसत असले तरी विषमता कमी होत नाही यामागील नेमके कारण शोधणे आवश्यक आहे. मोठ्या प्रमाणात होत असलेले यांत्रिकीकरण, शेतीचे दुरावस्था, वाढती लोकसंख्या , पायाभूत सुविधांचा अभाव ही कारणे सांगता येतील.

लोकांमध्ये वाढत असलेली संचयवृत्ती एकाच वेळेस अनेक समस्यांना आमंत्रित करत आहे. गरज नसताना झालेल्या वस्तूंच्या उत्पादनामुळे प्रदूषणामध्ये वाढ होणे, वस्तूंच्या किंमती वाढणे, वस्तू किंवा उत्पादनांचा तुटवडा निर्माण होणे, जास्तीत जास्त उपभोगाच्या वस्तू मिळवण्यासाठी गैर मार्गाचा अवलंब करणे या गोष्टी घडत असल्याचे दिसून येते.

आपले सण उत्सव हे ' आनंद घेऊ आणि देवू ' या संकल्पनेवर आधारित आहेत. अशा सणांच्या या काळात गरीब, वंचित, दुर्बल घटकांना सुखाचे चार क्षण देण्याचा प्रयत्न आपण केला पाहिजे. मुद्दामहून फुटपाथ वर विक्री करणाऱ्या विक्रेत्यांकडून कोणत्याही प्रकारची घासाघिसी न करता खरेदी केली पाहिजे. ' रस्ते का माल सस्ते मे!' ही समज अन्यायकारक आहे; कारण रस्त्यावरील विक्रेत्यांना अशा सण उत्सवाच्या माध्यमातूनच आपली रोजी रोटी कमवायला मिळत असते. इतर काळ त्यांना बेकार राहावे लागते. त्यांच्या मुलांचे आणि कुटुंबाचे शिक्षण, आरोग्य आणि पालनपोषण करण्यासाठी आपण अशा प्रकारे अप्रत्यक्षपणे त्यांना मदतच करू शकतो.आपले सण साजरे करणे इतरांना फायद्याचे कसे होईल...याचा विचार आपण नेहमी केला पाहिजे.

**- किशोर जाधव, सोलापूर**
**- मो. नं. ९९२२८८२५४१**


This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

## थोडक्यात

### जोगेश्वरीत सी पी आर ट्रेनिंग सेमिनार संपन्न




**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२९, अंधेरी :** पूर्व विधानसभा मतदार संघाच्या वतीने गुढी पाडवा सणा निमित्त जोगेश्वरी पूर्व येथील निवडणूक कार्यालयातील कर्मचाऱ्यांसाठी मा. मतदार नोंदणी अधिकारी मा, प्रशाली दिघावकर व सहा.मतदार नोंदणी अधिकारी मा. डॉ. नंदकिशोर देशमुख यांच्या मार्गदर्शना खाली दिनांक २८ मार्च २०२५ रोजी दुपारी तीन वाजता डॉ रोशन झा यांच्या मार्ग दर्शनाखाली सी पी आर कसा देण्यात येतो, त्याचप्रमाणे एखाद्याला हार्ट अटॅक आला तर त्याचा जीव वाचविण्यासाठी आपल्याला प्राथमिक अवस्थेत कोणत्या उपाययोजना करणे गरजेचे आहे याबद्दल माहिती देण्यात आली. मल्लिका हॉस्पिटल मधील प्रसिद्ध कार्डिओलोजिस्ट डॉ झा यांनी माहिती बरोबरच पेशंटला सी पी आर कसा द्यायचा याचे प्रात्यक्षिक तसेच उपस्थितांच्या प्रश्नांना उत्तरे देखील दिली. रोटरी क्लब, सन फार्मा, १६६ अंधेरी पूर्व विधानसभा, मल्लिका हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमाने आजचा उपक्रम पार पडला. उपक्रम घेण्यासाठी नायब तहसीलदार नरेश जागकर, सतीश मीठबावकर, राजेश खरात, अविनाश राठोड, रवींद्र गोसावी आदी मान्यवरांनी पुढाकार घेतला होता. असा समाजोपयोगी कार्यक्रम कोणाला आयोजित करायचा असेल तर अरुण वाधवा ९८२००६७७६५ आणि हेमंत खरात ९९८७४९११६३ संपर्क करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

### शासनाची सकारात्मक प्रतिमा निर्माण करावी - पालकमंत्री बावनकुळे



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२९, नाशिक :** रमजान ईदच्या पार्श्वभूमीवर होणारी गर्दी पाहता सोमवारी शहरातील काही भागात वाहतूक मार्गात बदल करण्यात आले आहेत.भद्रकाली पोलीस ठाणे अंतर्गत फाळके रोड ते दूध बाजार, बादशाही कॉर्नर, महात्मा फुले पोलीस चौकी ते चौक मंडई या ठिकाणी बाजार भरत असल्याने ईद सणाच्या खरेदीसाठी मोठ्या प्रमाणात मुस्लीम बांधवाची गर्दी असते.

ईदच्या दिवशी मुंबई नाका पोलीस ठाणे हद्दीतील ईदगाह मैदानावर शहराच्या विविध भागातून मुस्लीम बांधव नमाज पठणासाठी येतात. यावेळी होणारी वाहनांची गर्दी पाहता वाहतूक मार्गात बदल करण्यात आले आहेत. रविवारी दुपारी तीन ते रात्री १२ या वेळेत दूध बाजार चौक ते फाळके रोड, फाळके राड ते चौक मंडई, चौक मंडई ते महात्मा फुले पोलीस चौकी हा रस्ता वाहतुकीसाठी बंद ठेवण्यात येणार आहे. वाहनचालकांनी पर्यायी मार्गाचा अवलंब करावा. तसेच ३१ मार्च रोजी ईदच्या दिवशी सकाळी सात ते दुपारी एक या वेळेत मुंबई नाका सिग्नल ते गडकरी सिग्नल, सीबीएस सिग्नल ते मोडक सिग्नल, भवानी सर्कल ते जलतरण तलाव सिग्नल हा रस्ता वाहतुकीसाठी बंद ठेवण्यात आला आहे. वाहनचालकांनी पर्यायी मार्गाचा अवलंब करत वाहतूक विभागाला सहकार्य करावे, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.

**पोलीस बंदोबस्तात वाढ !**

भद्रकाली तसेच ईदगाह मैदानावर ईदसाठी होणारे नमाज पठण पाहता कुठलाही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी मोठ्या प्रमाणावर पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. यामध्ये दूधबाजार चौक, फाळके रोड टी पॉईंट, चौक मंडई, महात्मा फुले चौकी, जलतरण तलाव सिग्नल, मोडक सिग्नल, गडकरी सिग्नल, चांडक सर्कल, सीबीएस सिग्नल आदी ठिकाणी बंदोबस्त राहणार आहे.

### परळीतील राज ठाकरे यांच्या विरोधातील दोषारोपपत्र रद्द



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२९, छत्रपती संभाजीनगर :** महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या विरोधात परळी वैजनाथ येथील ग्रामीण पोलीस ठाण्यात दाखल गुन्हा आणि दोषारोपपत्र मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाच्या न्या. विभा कंकणवाडी व न्या. संजय देशमुख यांनी रद्द केले. राज ठाकरे यांच्या अटकेनंतर २००८ साली उसळलेल्या दंगलीमध्ये परळी-गंगाखेड या मार्गावर एस. टी. बस थांबवून दगडफेक झाल्याची घटना घडली होती. या प्रकरणी राज ठाकरे व इतर आरोपीविरुध्द विविध कलमांखालील गुन्ह्यांसह सार्वजनिक संपत्तीस हानी प्रतिबंध कायदा तसेच मुंबई पोलीस कायदा कलम ११३५ अन्वये परळी वैजनाथ येथील ग्रामीण येथे प्रथम प्राथमिक अहवाल माहितीची (एफआयआर) नोंद घेण्यात आली. संबंधित तपासी अधिकारी यांनी गुन्हयाचा तपास करून राज ठाकरे व इतर आरोपी यांच्या विरोधात परळीच्या प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले. त्याला ॲड अरुण शेजवळ यांच्यामार्फत खंडपीठात आव्हान देण्यात आले होते. सुनावणीमध्ये राज ठाकरे यांच्या विरोधात कोणताही सबळ पुरावा दोषारोपपत्रात नाही तसेच कथीत घटनेच्या वेळेस राज ठाकरे हे घटनास्थळी नव्हते, आदी मुद्यांवर युक्तिवाद करण्यात आला. ॲड. शेजवळ यांना सांची किर्तीकर यांनी सहकार्य केले.

# धरती के लाल न कर इतना मलाल

## (आनंद बक्षी स्मृतिदिन विशेष.)

कलाकार बनण्याचे स्वप्न उरी बाळगणारा हा रांगडा गडी नेहमी म्हणायचा, जीवनात यशस्वी व्हायचे असेल तर ध्येय हवे. आपण गायक व्हायचे, असे आनंद बक्षींच्या मनात खूप होते. मात्र त्यांच्यातील कविमनाने गायकीवर मात केली. ते गीतकार बनले आणि जन्माला आली तुमचे -आमचे जीवन फुलवणारी, अविस्मरणीय गाणी. शब्दांच्या या जादूगाराने आपल्या गीतांनी रसिकांना जणू मोहिनीच घातली. प्रेमाची ओढ असो की विरह, आई-मुलातील वात्सल्य असो की मरणाची अपरिहार्यता असो, आनंद बक्षींच्या लेखणीने या सर्व भावना रसिकांच्या मनी ठसायच्या.

सन १९५८मध्ये आलेला 'भला आदमी' हा गीतकार आनंद बक्षींचा पहिला चित्रपट. 'धरती के लाल न कर इतना मलाल' हे त्यांचे पहिले गाणे. आनंद बक्षी प्रकाशझोतात आले ते 'जब जब फूल खिले'च्या गीतांमुळे. या चित्रपटात त्यांची लेखणी अशी खुलली की तिने रसिकांची मने काबीज केली. 'ये समा, समा है ये प्यार का' हे यातले लताच्या आवाजातले गाणे आजही ताजे, टवटवीत वाटते. सहज ओठांवर येतील असे साधे, आशयघन शब्द, मनाला भावणा-या शब्दांची यमकालंकारात केलेली सहज-सोपी गुंफण ही आनंद बक्षींच्या गाण्यांची वैशिष्ट्ये. रसिकांच्या मनातले भाव नेमकेपणाने त्यांच्या गीतांत उतरायचे. मैत्री असो की द्वेष, प्रेम असो की मत्सर, वासल्य असो की कारुण्य, जीवनाचे तत्त्वज्ञान असो की फँटसी, आनंद बक्षींची लेखणी हे सारे भावविश्व चपखलपणे टिपायची. या सर्व भावना मग सुंदर गीतातून रसिकांच्या मनात रुंजी घालायच्या. आदमी मुसाफिर है, आता है जाता है - अपनापन मधून जीवनचक्रावर भाष्य करणारे बक्षी, इश्क बिना क्या जीना यारो- ताल हा भावही तरलपणे मांडतात. कोरा कागज था ये मन मेरा- आराधना अशी प्रांजळ कबुली देत आनंद बक्षी प्रेमाची ग्वाही देतात, तिला पाहताच दर्दे दिल दर्दे जिगर, दिल में जगाया आपने-कर्ज अशी स्पष्ट कबुली देतात. पुढच्याच पावलावर मैं शायर तो नहीं-बॉबी असे सांगत तिच्या प्रभावाचे वलय स्पष्ट करतात. शीशा हो या दिल- आशा मधून ते पुढील धोक्याची जाणीवही करून देतात. प्रेमाचा बहर संपल्यानंतरचा नैराश्य, वैफल्याचा भाव व्यक्त करताना आनंद बक्षींच्या लेखणीला जणू आगळी धारच चढते. त्यांच्या ४० गाण्यांना फिल्मफेअरमध्ये नामांकन मिळाले. चार वेळा त्यांना फिल्मफेअर पुरस्कार मिळाला. आपल्या सिद्धहस्त लेखणीने रसिकांच्या जीवनात मधुर आनंद पसरवणाऱ्या आनंद बक्षी यांना मनापासून सलाम!



आनंद बक्षी हे एक हिंदी गीतकार व कवी होते. त्यांचा जन्म दि.२१ जुलै १९३० रोजी आताच्या पाकिस्तानमधील रावळपिंडी येथे काश्मीरी मोहयाल ब्राह्मण कुटुंबात झाला. त्यांची आई सुमित्रा आनंद बक्षी ते पाच वर्षांचे असतानाच वारली. त्यांचे कुटुंब भारताच्या फाळणी दरम्यान २ ऑक्टोबर १९४७ रोजी भारतात आले. डकोटा विमानातून दिल्लीला आल्यावर बक्षी कुटुंब पुणे, मेरठ आणि शेवटी परत दिल्लीत येऊन स्थायिक झाले. कविता हा ज्यांचा जीव की प्राण. त्यांचे विश्वच निराळे. शब्दांच्या मळ्यात फिरणारे. त्यात त्यांच्या वाट्याला आली लष्करातली नोकरी. लष्कराच्या कडक शिस्तीत शब्दांना अधिकच साचेबद्धता आली. ते रुक्ष वातावरण, तो युद्धाचा सराव, लष्करी कवायत अशा वातावरणात हा शब्दप्रभू कवितेच्या मळ्यात खुशाल बागडायचा. अंगच्या प्रतिभेने रुपेरी पडद्याच्या दालनात त्यांनी प्रवेश केला. त्यांनी रसिकांना जिंकले. कारण त्यांच्या शब्दांची जादूच तशी होती. त्यांच्या लेखणीतून उतरलेल्या गीतांनी तरुणाईला झिंग आणली. गायक व्हायचे आनंद बक्षींच्या मनात खूप होते. मात्र, त्यांच्यातील कविमनाने गायकीवर मात केली. ते गीतकार बनले आणि जन्माला आली तुमचे-आमचे जीवन फुलवणारी, अविस्मरणीय गाणी. शब्दांच्या या जादुगाराने आपल्या गीतांनी रसिकांना जणू मोहिनीच घातली. प्रेमाची ओढ असो की विरह, आई-मुलातील वात्सल्य असो की मरणाची अपरिहार्यता असो, आनंद बक्षींच्या लेखणीने या सर्व भावना रसिकांच्या मनी ठसायच्या. सन १९५८मध्ये आलेला 'भला आदमी' हा गीतकार आनंद बक्षींचा पहिला चित्रपट. 'धरती के लाल न कर इतना मलाल' हे त्यांचे पहिले गाणे. आनंद बक्षी प्रकाशझोतात आले ते 'जब जब फूल खिले'च्या गीतांमुळे. या चित्रपटात त्यांची लेखणी अशी खुलली की तिने रसिकांची मने काबीज केली. 'ये समा, समा है ये प्यार का' हे यातले लताच्या आवाजातले गाणे आजही ताजे, टवटवीत वाटते. सहज ओठांवर येतील असे साधे, आशयघन शब्द, मनाला भावणार्या शब्दांची यमकालंकारात केलेली सहज-सोपी गुंफण ही आनंद बक्षींच्या गाण्यांची वैशिष्ट्ये. रसिकांच्या मनातले भाव नेमकेपणाने त्यांच्या गीतांत उतरायचे. मैत्री असो की द्वेष, प्रेम असो की मत्सर, वासल्य असो की कारुण्य, जीवनाचे तत्त्वज्ञान असो की फँटसी, आनंद बक्षींची लेखणी हे सारे भावविश्व चपखलपणे टिपायची. या सर्व भावना मग सुंदर गीतातून रसिकांच्या मनात रुंजी घालायच्या. संगीतकार लक्ष्मीकांत-प्यारेलाल यांच्याबरोबर आनंद बक्षी यांचे सूर जुळले. या त्रयीने अनेक अविस्मरणीय गाणी दिली आहेत. आने से उसके आये बहार-जीने की राह, बिंदिया चमकेगी-दो रास्ते, सावन का महीना-मिलन, मैं शायर तो नहीं-बॉबी, परदा है परदा-अमर अकबर अँथोनी, आदमी मुसाफिर है-अपनापन, डफलीवाले-सरगम, ओम शांती ओम-कर्ज ही आनंद बक्षी-लक्ष्मी-प्यारे या त्रयींची काही सुपरहिट गाणी. लक्ष्मी-प्यारे यांच्याप्रमाणेच राहुलदेव बर्मन-आरडी यांच्याबरोबरही आनंद बक्षी यांचे सूर जुळले. ना कोई उमंग है-कटी पतंग, रैना बीती जाए-अमर प्रेम, महेबूबा महेबूबा-शोले, परबत के पीछे-महेबूबा, सावन के झूले पडे-जुर्माना, दम मारो दम-हरे राम ही आरडी-आनंद बक्षी यांची काही गाजलेली गाणी आहेत. कल्याणजी-आनंदजी, अन्नु मलिक, राजेश रोशन या संगीतकारांसाठीही आनंद बक्षी यांनी अनेक अविस्मरणीय गाणी दिली आहेत. अशा या महान गीतकाराचे दि.३० मार्च २००२ रोजी निधन झाले. त्यांना आज पुण्यस्मरण दिन सप्ताहांत मनापासून सलाम !!

**- संकलन व शब्दांकन -**
**श्री.कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरुजी.**
**रामनगर, गडचिरोली.**
**फक्त व्हॉट्सअ‍ॅप- ९४२३७१४८८३.**

# सामाजिक अवस्था,कालची आणि आजची...

माणूस हा समाजात राहणारा बुद्धिवान प्राणी आहे.पण हाच बुध्दीवान प्राणी आजकाल बुद्धीहीन प्राणी झाला आहे की काय? असे वाटत आहे.कारण एकेकाळी माणसाला आपल्या माणसांशी कसा व्यवहार करावा हे चांगले ज्ञात होते.समाजबांधवांशी आपुलकीने व प्रेमाने राहणे हे माणसाला चांगले जमायचे.माणूस माणसाला चांगला ओळखायचा.एकमेकांना मान-सन्मान द्यायचा.एकमेकांच्या सुख-दुःखात पटकन सहभागी व्हायचा. एकमेकांच्या अडी-अडचणी सोडवायचा.म्हणजे कालच्या माणसात मानवताच मानवता पाहायला मिळायची आणि माणूस माणूसकीने ओतप्रोत भरलेला होता. पण कालची सामाजिक अवस्था पाहायला गेलो तर ती बावनकशी सोन्यासारखी शुद्ध होती आणि तेव्हाची माणसे सुध्दा शीलवान गुणवान व चारित्र्यवान होती. आपल्या शिलाला व चारित्र्याला जिवापाड जपणारी होती.तेव्हा एकत्र कुटुंब पद्धत अस्तित्वात होती. तेव्हा अतिथी देव भव समजले जायचे. पाहुण्यांचे आदराने स्वागत केले जायचे व नंतर विचार-विनिमय केला जायचा.

म्हणजे कालची सामाजिक अवस्था निर्मळ पाण्यासारखी शुद्ध होती.माझ्या खंडाळी गावाला ऐतिहासिक पार्श्वभूमी लाभली आहे.माझे पंजोबा आप्पाराव कांबळे हे तत्कालीन सुप्रसिद्ध गायक व पेटी मास्टर होते.आणि विशेष म्हणजे ते लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचे जिवलग मित्र होते.

अन्नाभाऊ साठे हे काही दिवस खंडाळी व धसवाडीला मुक्कामी होते.तेव्हा माझे आजोबा आप्पाराव कांबळे हे त्यांच्यासोबत लोकनाट्यात सहभागी व्हायचे. सांगायचा मुद्दा म्हणजे कालची माणसे जरुर अल्पशिक्षित होती, परंतू कर्तृत्ववान व वाखाण्याजोगी होती.आपल्या अलौकीक कार्याने लोकांच्या मनावर अधिराज्य गाजवणारी होती.छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज व डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे महापुरुष आजही आपल्या अलौकिक कार्याने जगाच्या ओठांवर आहेत. यांना आधुनिक भारताचे राष्ट्रनिर्माते म्हटले तर ते वावगे ठरणार नाही.परंतु खेदाची बाब अशी की, आजच्या माणसांमध्ये कालच्या माणसांइतकी प्रामाणिकता व कर्तव्यनिष्ठा का राहिली नाही? आजचा माणूस इतका लबाड, ढोंगी, कपटी व नीच प्रवृत्तीचा का झाला आहे? का आजच्या माणसांमध्ये माणुसकी लयास जात आहे? या प्रश्नांची उत्तरे आपण स्वतःलाच विचारावित. कारण आजचा माणूस आधुनिक युगात जगत आहे.प्रत्येकाकडे फिरायला गाडी आहे, राहायला माडी आहे, बसायला खुर्ची आहे आणि हातामध्ये भारी किंमतीचा अँड्रॉइड मोबाईल आहे.

आज इतक्या प्रगतीपथावर माणसाने देश नेला आहे.हे खरे आहे. पण इतका प्रगतशील देश असुनही आजचा माणूस कालच्याएवढा सुखी का नाही? कारण सगळीकडेच चोरांच्या उलट्या बोंबा सुरू आहेत.माणूस माणसाला कमी लेखत आहे.आजचा माणूस गर्विष्ठ व अहंकारी झाला आहे. आपल्याच तोऱ्यात राहत आहे. मीच लय शहाणा म्हणत आहे. म्हणून हल्ली समाजाची अवस्था पार बिघडून गेली आहे.कालची आणि आजची सामाजिक अवस्था यामध्ये फार मोठी दरी निर्माण झाली आहे. आणि ही दरी आता अक्राळविक्राळ रुप धारण करत आहे.आपल्याला कालची आणि आजची सामाजिक अवस्था एक ठेवायची असेल तर पहिल्यांदा आपण माणूस बनले पाहिजे आणि माणसासारखा व्यवहार केला पाहिजे. मानवता हाच खरा धर्म आहे हे ओळखले पाहिजे. जातीयता समूळ नष्ट केली पाहिजे.भाईचारा वाढवला पाहिजे तरच आजची सामाजिक व्यवस्था अबाधित राहील....

**- बुध्दभूषण चंद्रकांत कांबळे**
**मु.पो.खंडाळी, ता.अहमदपूर**
**जिल्हा लातूर**
**मो.७४९८७१५६६१**

# विंचूर उपबाजार समिती ५ दिवस बंद

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.२९, विंचूर (नाशिक) :** विंचूर उपबाजार समितीत शेतीमालाचे लिलाव शुक्रवार ते मंगळवार या दरम्यान ५ दिव बंद राहणार आहेत. विंचूर उपबाजार समितीत जिल्ह्यातील व जिल्ह्याबाहेरील विविध भागातील शेतकरी आपला शेतमाल विक्रीसाठी आणत असतात. मात्र व्यापारी वर्गाची सुटी, शनि अमावस्या, सण उत्सवामुळे पाच दिवस लिलाव बंद ठेवण्यात आले आहेत.

शुक्रवार रोजी कांदा व्यापारी वर्गास बाहेरगावी जावयाचे असल्याने कांदा लिलाव बंद राहतील.

सदर दिवशी भुसार व तेलबिया या शेतीमालाचे लिलाव चालू राहणार आहेत. शनिवार, दिनांक २९ मार्च २०२५ रोजी शनि अमावस्या, सोमवार, दिनांक ३१ मार्च २०२५ रोजी रमजान ईद तर मंगळवार, दिनांक ०१ एप्रिल २०२५ रोजी बँक व्यवहार बंद असल्याने कांदा व भुसार तेलबिया या शेतमालाचे लिलाव बंद राहतील.

बुधवार, दिनांक ०२ एप्रिल २०२५ पासून सर्व शेतीमालाचे लिलाव सुरळीतपणे होतील. अशी माहिती विंचूर उपबाजार समितीच्या वतीने देण्यात आली आहे. विंचूर उपबाजार समिती ५ दिवस बंद असल्याने याचा परिणाम विंचूर शहरतील बाजार पेठेवर होणार आहे.

